# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**बातमी क्र.१**

जा.क्र.:कबचौउमवि/१६/अभिवाचन-बातमी/हस्तदेय/२०१९ दि. १७ ऑक्टोबर,२०१९

जळगाव दि.१७ ( ) महात्मा गांधींना कितीही नाकारायचे ठरविले तरी कोणालाच नाकारता येणे शक्य नाही, मात्र गांधी स्विकारणे देखील तितकेच कठिण असल्याचा आशय सांगणाऱ्या नाट्य अभिवाचनाने गुरुवारी प्रेक्षकांना अक्षरश: खिळवून ठेवत गांधीमय केले.

डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिनांतर्गत अभिवाचन महोत्सवाचे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात करण्यात आले. महोत्सवाच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवशी शंभु पाटील लिखित 'गांधी नाकारायचाय' या नाट्याचे अभिवाचन झाले. परिवर्तन ग्रुपच्या कलावंतानी हे अभिवाचन केले. या कार्यक्रमास जैन उद्योग समुहाचे प्रमुख अशोक जैन, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी, अनिसभाई शाह उपस्थित होते.

महात्मा गांधी हा फार सहज तर कधी निंदेचा विषय समजला जातो त्या पार्श्वभूमीवर या नाट्यात गांधींना समाज न्यायालयाच्या आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करुन त्यांच्यावर खटला उभा केला जातो. यात अनेक वृत्ती-प्रवृत्ती, त्यांनी केलेली गांधींची मिमांसा, टिका असा सुरु झालेला हा प्रवास गांधींचे आजच्या काळातही असलेले महत्व अधोरेखित करत संपतो. अनेक गमती जमती, चिमटे काढत प्रेक्षकांना या अभिवाचनाने अंतर्मुख केले. गांधी समजून घेण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी वाचायला हवे. असे सांगत कलावंतांनी नाट्यानुभव दिला. विकास जैन यांनी महात्मा गांधीची भूमिका साकारली. या अभिवाचनात नारायण बाविस्कर, होसिलसिंग राजपूत, मंजूषा भिडे, मंगेश कुलकर्णी, हर्षल पाटील हे कलावंत सहभागी झाले होते. प्रकाश योजना व निर्मिती प्रमुख राहूल निंबाळकर होते. नाट्य अभिवाचनापूर्वी वैशाली शर्मा यांनी प्रास्ताविक केले.

---

**बातमी क्र.२**

जा.क्र.:कबचौउमवि/१६/कार्यशाळा/हस्तदेय/२०१९ दि. १७ ऑक्टोबर,२०१९

जळगाव दि.१७ ( ) व्यावसायिक नैतिकता व शिष्टाचार शिकणे व स्वत:च्या क्षमता ओळखून त्यांचा वापर करुन आपले करीअर घडवणे आजच्या काळाची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.एल.ए.पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्षमता विकास केंद्राच्यावतीने 'रोजगार कौशल्य' या विषयावर दि.१६ व १७ ऑक्टोबर या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्रा.एल.ए.पाटील बोलत होते. कार्यक्रमास प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, कार्यशाळेचे आयोजक तथा केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ.ए.एम.महाजन, व्यवस्थापन प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे हे उपस्थित होते.

प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबत कौशल्य विकसनाचे महत्व विषद करुन विद्यापीठाच्या माध्यमातून विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणेसाठी कटीबध्द असल्याचे सांगीतले. या कार्यशाळेसाठी कार्यशाळेच्या समन्वयक, डॉ.मधुलिका सोनवणे, डॉ.रमेश सरदार, डॉ.पवित्रा पाटील, डॉ.आर.आर.आर. चव्हाण व डॉ.अतुल बारेकर यांनी प्रशिक्षक म्हणून काम

पाहिले. कार्यशाळेत व्यवस्थापकीय व व्यावसायिक कौशल्ये, स्वत:ची ओळख, परियच लेखन, गटचर्चा व मुलाखती या कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

---

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी